दयानंद शिक्षण संस्था,लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

## दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मासिक ई-मॅगझीन

JUN 2026

### महिना : जून २०२६

**महाविद्यालयात**
**आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,**
**क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे**
**मासिक ई-मॅगझीन.**










No : 1234567890000000000



# देशातील अव्वल गायिका सायली टाकची दयानंद कला महाविद्यालयात एंट्री; प्रतिभेच्या जडणघडणीची जबाबदारी महाविद्यालयाने घेतली

लातूर, दि. ६ (प्रतिनिधी) मराठवाड्यातील अग्रगण्य व प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था म्हणून ओळख असलेल्या दयानंद कला महाविद्यालयाने आणखी एका गुणी कलावंत विद्यार्थिनीचे स्वागत करून आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेत नवा अध्याय जोडला आहे. राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावणारी तसेच स्टार प्रवाह वाहिनीवरील लोकप्रिय “मी होणार सुपरस्टार”या रिअॅलिटी शोची विजेती कु. सायली टाक हिने दयानंद कला महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला आहे.

कु. सायली टाक हिचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते तिच्या पालकांच्या उपस्थितीत औपचारिक स्वागत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाने तिच्या कलाविकासासाठी आवश्यक सर्व शैक्षणिक व सांस्कृतिक सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त करत तिचे पालकत्व स्वीकारल्याची भावना व्यक्त केली.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद कला महाविद्यालय हे संगीत, नाट्य, चित्रकला, कीर्तन आणि विविध कलाविषयांच्या दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. महाविद्यालयात संगीतासाठी सुसज्ज वाद्यसंग्रह, नाट्यप्रशिक्षणासाठी रंगमंच तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा, व्यासपीठ आणि प्रेरणा मिळते.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात मागील अनेक वर्षांपासून सर्वाधिक सर्वसाधारण विजेतेपद पटकावणारे दयानंद कला महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. कलावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेमार्फत लाखो रुपयांच्या शिष्यवृत्तीही दिल्या जातात. याचा लाभ घेत अनेक विद्यार्थी आज दूरदर्शन, चित्रपट आणि व्यावसायिक कलाक्षेत्रात यशस्वी कारकीर्द घडवत आहेत. आतापर्यंत या महाविद्यालयातील ३१ विद्यार्थी दूरदर्शन व चित्रपटसृष्टीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत.

सायली टाक हिने राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत भारतात प्रथम क्रमांक मिळवून राज्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तसेच प्रा. शशिकांत देशमुख व डॉ. वृशाली देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तिला सीसीआरटी शिष्यवृत्तीही प्राप्त झाली आहे.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, संगीत विभाग प्रमुख व आयक्यूएसी प्रमुख डॉ. संतोष पाटील, डॉ. सुनील साळुंके, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. सुवर्णा लवंद, डॉ. दुर्गा शर्मा, कार्यालयीन अधीक्षक संजय व्यास तसेच सुनील टाक यांची प्रमुख उपस्थिती होती.

दयानंद कला महाविद्यालयाची समृद्ध सांस्कृतिक परंपरा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, कला-संवेदना आणि सामाजिक बांधिलकी विकसित करत आहे. त्यामुळे हे महाविद्यालय नवोदित कलावंतांसाठी केवळ शिक्षणसंस्था नसून एक सृजनशील संस्कारकेंद्र म्हणून उदयास आले आहे.



# दयानंद महाविद्यालयाच्या वतीने प्रा. किसनाथ कुडके यांचा सत्कार

दयानंद महाविद्यालयाच्या वतीने प्रा. किसनाथ कुडके यांचा सत्कार

लातूर : राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर) लातूर जिल्हा समन्वयकपदी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रा. किसनाथ कुडके यांची नियुक्ती झाल्याबद्दल दयानंद महाविद्यालय, लातूर यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. प्रशांत दीक्षित, राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे तसेच प्रा. सिद्धार्थ भालेराव उपस्थित होते.

प्रा. किसनाथ कुडके हे दयानंद महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून त्यांनी बारावीपासून एम.ए. (इंग्रजी) पर्यंतचे शिक्षण दयानंद महाविद्यालयात पूर्ण केले आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून हा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी प्रा. कुडके यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. जिल्हा समन्वयक म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजना अधिक प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.



# लातूरचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व श्री. रमेश बियाणी यांना 'महेश भूषण' पुरस्कार प्रदान; दयानंद सभागृहात भव्य सोहळा संपन्न




लातूर:जिल्हा माहेश्वरी सभा, लातूर यांच्या वतीने महेश नवमी उत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला भव्य सन्मान सोहळा नुकताच दयानंद सभागृहात अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला."  या सोहळ्यात लातूरच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय, अभूतपूर्व आणि ऐतिहासिक योगदानाचा गौरव करत दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव आदरणीय श्री. रमेश गोविंदलालजी बियाणी यांना अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा 'महेश भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा सोहळा महाराष्ट्राचे केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव मा. श्री. अनिलजी नावंदर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट व सचिव राजेश मंत्री, तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या खंबीर नेतृत्वाखाली अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

लातूरच्या एका प्रतिष्ठित व्यापारी कुटुंबात जन्मलेल्या श्री. रमेश बियाणी यांनी सुरुवातीपासूनच समाजकारणाचा ध्यास घेतला. सन २००६ पासून दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव म्हणून धुरा सांभाळत असताना त्यांनी 'लातूर पॅटर्न' निर्माण करणाऱ्या या संस्थेच्या सर्वांगीण विकासात आणि उत्तुंग प्रगतीत नेहमीच मार्गदर्शकाची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांना आधुनिक व व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू केले. शिक्षण क्षेत्राला आधुनिकतेची जोड देत त्यांनी वर्गात डिजिटल बोर्ड आणि 'कॉपीमुक्त परीक्षा' धोरणासारख्या अत्याधुनिक संकल्पना यशस्वीपणे राबवल्या. विशेष म्हणजे, महाराष्ट्रात सर्वप्रथम ऑनलाईन शिक्षणाची सुरुवात दयानंद संस्थेत झाली, ज्याची दखल थेट महाराष्ट्र विधानसभेत घेतली जाऊन तत्कालीन मंत्र्यांनी राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन शिक्षण सुरू करण्याचे निर्देश दिले होते. भविष्यातील विकसित लातूरची संकल्पना मांडणारा 'लातूर-२०४७' हा त्यांचा दूरदर्शी उपक्रम सादर केला, २०२१ मध्ये सिद्धेश्वर-रत्नेश्वर येथे २५ आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील जोडप्यांचे सामूहिक विवाह देखील त्यांनी यशस्वीपणे लावून दिले. या सोहळ्यात श्री. बियाणी यांच्या याच बहुआयामी आणि समाजोपयोगी कार्याची उदात्त यशोगाथा अत्यंत आदराने आणि कृतज्ञतेने अधोरेखित करण्यात आली.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना श्री. रमेश बियाणी यांनी समाजासमोरील आव्हाने, तरुण पिढीची जबाबदारी, आपली संस्कृती आणि भविष्यातील नियोजनावर सविस्तर प्रकाश टाकला. मला आपल्या नवीन युवा पिढीवर प्रचंड विश्वास आहे. आपल्या वाडवडिलांनी दिलेले आणि आपल्या डीएनए मध्ये खोलवर रुजलेले जे संस्कार आहेत, त्या संस्कारांच्या बळावर ही युवा पिढी सद्यस्थितीतील सर्व प्रश्नांचे योग्य उत्तर नक्कीच शोधून काढेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या भाषणात पुढे बोलताना बियाणी यांनी माहेश्वरी समाजाच्या सामाजिक योगदानाचा अत्यंत गौरवपूर्ण इतिहास मांडला. ते म्हणाले की, आम्ही नेहमीच सर्वसमावेशक विचार केला आहे. शिक्षण क्षेत्राचे उदाहरण घेतले, तर 'राजस्थान शिक्षण संस्था' या पवित्र माध्यमाच्या आणि दूरदृष्टीच्या विचारातून अगदी स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच १९४७ च्या पूर्वीपासून महिलांना व मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षणाची दारे खुली करण्यात आली. आपली शक्ती फक्त स्वतःचा विचार केल्याने कधीच वाढत नाही, तर ती सर्वांसाठी काम केल्याने आणि सर्व समाजाला सोबत घेऊन पुढे गेल्याने अधिक पटीने वाढते. म्हणूनच या माहेश्वरी समाजाचे लातूरमध्ये एक विशेष आणि आदराचे महत्त्व राहिले आहे.

श्री. रमेश बियाणी यांनी समाजातील वंचित घटकांकडे पाहण्याच्या संवेदनशील दृष्टिकोनावर भाष्य करताना सांगितले की, वंचित, गरीब आणि गरजू लोक हे आपल्यातीलच आहेत. केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न असणे म्हणजेच सर्वकाही नाही, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रगतीचे साधन पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञान युगाचा वेध घेताना त्यांनी मानवी इच्छाशक्तीची ताकद आणि अध्यात्माची जोड यांची सुरेख सांगड घातली. आज संपूर्ण जग आर्टिफिशियल इंटेलिजन्सबद्दल बोलत आहे आणि अनेक जण मानवी अस्तित्वाची चिंता करत आहेत; परंतु माणसाची अंतर्गत जाणीव आणि प्रबळ इच्छाशक्ती ही कोणत्याही यंत्रापेक्षा श्रेष्ठ असते. ज्या गोष्टी आपण पवित्र भावनेने हाती घेतो, त्यामध्ये एक 'कॉन्शियस इंटेलिजन्स दडलेला असतो आणि हे संपूर्ण ब्रह्मांड देखील आपल्या अंतर्मनाच्या पद्धतीने काम करत असते, असे त्यांनी निक्षून सांगितले.

या सोहळ्याला लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संघटन, महिला संघटन, लातूर शहर माहेश्वरी सभा, महेश सेना आणि माहेश्वरी समाजाचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, उद्योगपती, व्यापारी, शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज आणि नागरिक अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वोच्च आणि मानाच्या 'महेश भूषण' पुरस्काराबद्दल श्री. रमेश बियाणी यांच्यावर सध्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा सर्वच स्तरांतून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.






# दयानंद कला महाविद्यालयात लातूर शहर जिल्हाध्यक्ष तथा नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक डॉ. शिवाजी जवळगेकर सरांचा गौरवपूर्ण सत्कार




लातूरः लातूर शहर महानगरपालिकेचे नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. शिवाजी जवळगेकर यांनी आज दयानंद कला महाविद्यालयाला सदिच्छा भेट दिली. या मंगलप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते डॉ. जवळगेकर सरांचा दुसऱ्यांदा नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सस्नेह सत्कार करण्यात आला व पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या सदिच्छा भेटीदरम्यान लातूर शहरातील विविध विकासकामे, नागरिकांच्या समस्या आणि रचनात्मक सामाजिक कार्यांविषयी अत्यंत सकारात्मक व अभ्यासपूर्ण संवाद साधण्यात आला. तसेच या आत्मीय भेटीत जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, ज्यामुळे संवादातील अनेक सुवर्णक्षण पुन्हा सजीव झाले.

डॉ. शिवाजी जवळगेकर सरांनी दयानंद कला महाविद्यालयात १९९२ पासून प्राध्यापक म्हणून अध्यापन व मराठी विभाग प्रमुख पदाची जबाबदारी अत्यंत निष्ठेने सांपाळली असून, २०२४ मध्ये ते या सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. शैक्षणिक क्षेत्रासोबतच त्यांचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदानही मोठे आहे. डॉ. शिवाजी जवळगेकर हे लातूर महानगरपालिकेत दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून दाखल झाले आहेत. पहिल्यांदा ते जनतेमधून थेट नगरसेवक म्हणून निवडून आले होते, तर आता दुसऱ्यांदा त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाली आहे. पहिल्यांदा जेव्हा ते नगरसेवक झाले, तेव्हा महानगरपालिकेमध्ये सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले. याशिवाय त्यांनी लातूर महानगरपालिकेत सभापती पद भूषवले असून, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळात सदस्य म्हणूनही उल्लेखनीय कार्य केले आहे. सध्या ते लातूर शहर महानगरपालिका काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. राजकीय क्षेत्रासोबतच त्यांनी साहित्य क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले असून, दलित साहित्यामध्ये कथा, कविता असे विविध स्फुट लेखन करून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

जनतेच्या अपेक्षा पूर्ण करत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. शिवाजी जवळगेकर सरांचा हा दांडगा आणि प्रदीर्घ राजकीय-सामाजिक अनुभव अत्यंत समन्वयाने आणि प्रभावीपणे उपयोगी पडेल, असा सार्थ विश्वास प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केला. सरांच्या माध्यमातून सुरू झालेले जनकल्याणाचे हे नवे पर्व अधिक तेजस्वी आणि यशस्वी ठरो, अशी मनःपूर्वक सदिच्छा यावेळी महाविद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आली. या सत्कार सोहळ्याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा प्रारंभ; खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते ज्येष्ठ खेळाडू व विजेत्यांचा गौरव!

लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा प्रारंभ; खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते ज्येष्ठ खेळाडू व विजेत्यांचा गौरव!

लातूर: दयानंद शिक्षण संस्था व लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'स्व. राजगोपाल भार्गव स्मृती' जिल्हास्तरीय अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाली. लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यंदा आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत असून, या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचा शानदार बक्षीस वितरण आणि ज्येष्ठ बॅडमिंटनपटूंचा सत्कार सोहळा दयानंद शिक्षण संस्थेच्या मुलींच्या वसतिगृहाशेजारील मैदानावर पार पडला. या दिमाखदार सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार मा. डॉ. शिवाजीराव काळगे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी होते. याप्रसंगी लातूर अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रदीप राठी, लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी, असोसिएशनचे सचिव आशिष बाजपेयी, चैतन्य भार्गव, कमल अग्रवाल आणि डॉ. शिवपुजे यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी बोलताना खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी खेळाडूंच्या उत्कृष्ट कौशल्याचे कौतुक केले आणि लातूर जिल्ह्यातून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू तयार होतेल, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी शारीरिक व बौद्धिक विकासासाठी तसेच आपली एकाग्रता वाढवण्यासाठी खेळ खेळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होऊ न देता खेळामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला पाहिजे. दयानंद शिक्षण संस्थेसारखी संस्था महाराष्ट्रामध्ये विविध खेळांचे उत्तम नियोजन करून आपले विद्यार्थी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवत आहे. संस्थेने लातूरकरांसाठी दर्जेदार क्रीडांगणे उपलब्ध करून दिली आहेत, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे, अशा शब्दांत त्यांनी संस्थेच्या योगदानाचा विशेष गौरव केला.

लातूर अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रदीप राठी यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, आमच्या पिढीला खेळाची प्रचंड आवड होती आणि आजच्या पिढीनेही ती जोपासणे गरजेचे आहे. पन्नास वर्षांपूर्वी खेळण्यासाठी शटलकॉक आणण्यासाठी सुद्धा आमच्याकडे पैसे नसायचे, तरीही आम्ही जिद्दीने खेळलो. आज लातूरमध्ये जे क्रीडा क्षेत्रात उत्तम जाळे आणि पायाभूत सुविधा उभी राहिलेली आहेत, ती केवळ श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्यामुळेच शक्य झाली आहे. लाहोटी कुटुंबाची खेळाडू व मैदाने तयार करण्यामध्ये नेहमीच महत्त्वाची भूमिका राहिली आहे. लातूरने बॅडमिंटनमध्ये घेतलेल्या भरारीच्या पाऊलखुणा पन्नास वर्षांपूर्वी आपल्याला या भूमीत सापडतात, असे ते म्हणाले.

असोसिएशनचे सचिव श्री. आशिष बाजपेयी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, लातूरला बॅडमिंटन क्रीडागृहाची सुरुवात टाऊन हॉलपासून ५ ते १० रुपये गोळा करून झाली होती. लातूर आता केवळ 'शैक्षणिक पॅटर्न'मध्येच नव्हे, तर राजकीय आणि क्रीडा क्षेत्रातही प्रकर्षाने पुढे येत आहे. वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा अभ्यासाबरोबरच खो-खो, पोहणे व बॅडमिंटन अशा खेळांची आवड निर्माण करावी. आज लातूरमध्ये ३५ ते ४० दर्जेदार बॅडमिंटन क्रीडांगणे उपलब्ध असून नवयुवकांनी याचा लाभ घ्यावा आणि आपले करिअर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर घडवावे, असे आवाहन त्यांनी केले.

या स्पर्धेत मुलांच्या गटात उत्कर्ष सरवदे (११ वर्षांखालील एकेरी), सत्यजित पाटील (१३ वर्षांखालील एकेरी), सोहम मुळे (१५वर्षांखालील एकेरी), देवेश कासले (१७ वर्षांखालील एकेरी), सुमित माडे (१९ वर्षांखालील व खुली मुले एकेरी) आणि रुद्र पाटील व सुमित माडे (खुली दुहेरी गट) यांनी विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटात आर्या कोकरे हिने १३, १५ आणि १७ वर्षांखालील तिन्ही वयोगटांत एकेरीचे विजेतेपद मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली. स्पर्धेत उपविजेते ठरलेले खेळाडू पुढीलप्रमाणे राहिले: समर्थ पाटील नाईकवाडे (११ वर्षांखालील मुले एकेरी), वेदांत कटके (१३ वर्षांखालील मुले एकेरी), सर्वेश्वर बेदाडे (१५ आणि १७ वर्षांखालील मुले एकेरी), रुद्र पाटील (१९ वर्षांखालील व खुली मुले एकेरी), सुबोध टिळक आणि गौरव पांचाळ (खुली दुहेरी गट), आरोही म्हेत्रे (१३ वर्षांखालील मुली एकेरी), तुळशी बनसोडे (१५ वर्षांखालील मुली एकेरी) आणि कृतिका लवेकर (१७ वर्षांखालील मुली एकेरी).

या सोहळ्याप्रसंगी जिल्हा बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष डॉ. सतीश देशमुख, कोषाध्यक्ष श्री. मनीष राठी, प्रा. भरत चामले, श्री. कमल अग्रवाल, डॉ. शिवपूजे, चैतन्य भार्गव,श्री आनंद लाहोटी प्रामुख्याने उपस्थित होते. या बक्षीस वितरण सोहळ्यासाठी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, क्रीडाप्रेमी नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्री. आशिष सोमाणी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार चैतन्य भार्गव यांनी मानले.







# मासिक ई-मॅगझीन

## महिना : जून २०२६

**संपर्क**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org**

**आभार**
**या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक,**
**विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.**